दैनिक
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
# लक्ष महाराष्ट्र
www.lakshamaharashtra.com  lakshamaha.dhule@gmail.com  lakshamaha.nsk@gmail.com  RNI No.MAHMAR/2019/79184
धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ११५ वा ▶ गुरुवार दि. २९ फेब्रुवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ४




## न्यूज कॉलम

### मराठा आंदोलन ३ तारखेपर्यंत स्थगित


**जालना ।** मराठा आरक्षण लढ्याचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी ३ मार्चपर्यंत मराठा आरक्षणाचं आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. मागच्या काही दिवसांपासून राज्य सरकार आणि जरांगे पाटील यांच्या बेबनाव निर्माण झाल्याचं दिसून येत आहे. त्यातच त्यांनी हा निर्णय घेतला आहे. 'राज्य सरकार सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करत नाही, उलट मला बदनाम करण्यासाठी कटकारस्थान केलं जात आहे' असं म्हणत जरांगे पाटलांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं नाव घेऊन त्यांच्यावर खालच्या भाषेत टिपण्णी केली होती. त्यानंतर राज्य सरकारने जरांगेंची एसआयटी चौकशी लावली असून अनेक ठिकाणी आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्याची मोहीम सुरु केलीय. शिवाय संचारबंदीदेखील लागू केलीय.

### घरफोडीतील चार संशयित जेरबंद

**नाशिक ।** नाशिक शहरासह ग्रामीण भागात घरफोडीसह चोरी करणाऱ्या चार संशयितांना पोलिसांनी निफाड तालुक्यातून सापळा रचून शिताफीने जेरबंद केले आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून २ चारचाकी, ४ दुचाकी, २० तोळे सोने चांदीचे दागिणे असा मुद्देमाल हस्तगत केला आहे. शिवाजी ऊर्फ शिवा सदाशिव मालखेडे, महेश सदाशिव मालखेडे, संजय छोटू पहाडे व श्रावण पोपट भालेराव असे अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. आडगाव पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे जऊळके फाटा व निफाड येथून वरील चारही संशयितांना अटक केली.

# मोदींचा शरद पवारांवर हल्लाबोल: जेव्हा महाराष्ट्रातील कृषीमंत्री होते, तेव्हा केंद्रात यूपीएचे भ्रष्ट सरकार होते

**यवतमाळ । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



यवतमाळ जवळच्या भारी शिवारात बुधवारी (२८ फेब्रुवारी) महिला मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हजेरी लावली. मोदींबरोबर या कार्यक्रमाला राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील अनेक मंत्री उपस्थित होते. यावेळी मोदींच्या हस्ते नमो शेतकरी महासन्मान निधीचे वितरण करण्यात आले. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या १६ व्या हप्त्यापोटी दोन हजार रुपये आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या हफ्त्यापोटी चार हजार, असे एकूण प्रति शेतकरी सहा हजार रुपये आज शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा होणार आहेत.

किसान सन्मान निधीचं वाटप केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थितांना संबोधित केलं. यावेळी मोदी म्हणाले, एनडीए सरकारच्या काळात देशात मोठा विकास झाला आहे. परंतु, याआधीच्या सरकारच्या काळात काय होत होतं ते एकदा आठवून पाहा. आज जी 'इंडी' आघाडी तयार झाली आहे, यांचंच याआधी केंद्रात सरकार होतं. तेव्हा देशाची स्थिती काय होती ते एकदा आठवून पाहा. तेव्हाचे कृषीमंत्रीदेखील या महाराष्ट्राचे होते. त्या वेळी दिल्लीमधून विदर्भाच्या शेतकऱ्यांच्या नावाने पॅकेज घोषित केलं जायचं. परंतु, ते पॅकेज मध्येच लुटलं जात होतं. गावागावांमध्ये गरीब शेतकरी आणि आदिवासींना काहीच मिळत नव्हतं. परंतु, आजची परिस्थिती बघा. मी एक बटण दाबलं आणि बघता बघता पीएम किसान सन्मान निधीचे २१,००० कोटी रुपये देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले. हीच मोदींची गॅरंटी आहे.

#### आमच्या सरकारने ७५ टक्के घरांमध्ये पाणी पोहोचवलं

पूर्वी गावात कुठेतरी एखादा पाण्याचा नळ असायचा. पण आता ७५ टक्के जनतेच्या घरांमध्ये नळाचं पाणी पोहोचवण्यात आम्हाला यश आलं आहे, असं म्हणत पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर टीकास्त्र सोडलं.

#### मान, सन्मान आणि अभिमान म्हणजे मोदी : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

विकास व विरासतचे साक्षात्कार आहेत. त्यांचे साहस अलौकिक आहे. दुनियातील सर्व नेत्यांना मागे टाकत त्यांनी प्रथम स्थान मिळवले आहे. हा आपल्या देशाचा अभिमान आहे. १४० कोटी देशांचे ते आधारस्तंभ आहे. ते मान, सन्मान आणि अभिमान आहे असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

#### महिला, युवा, शेतकरी आणि गरीब केवळ या चार जाती : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महिला, युवा, किसान आणि गरीब केवळ या चार जाती असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी सांगतात. या चारही घटकांसाठी आजचा कार्यक्रम असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ४ हजार ७०० कोटी रुपये आज थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जात असल्याबद्दल नरेंद्र मोदी यांचे आभार व्यक्त करत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. नरेंद्र मोदी आवास योजनेचा शुभारंभ देखील आज होत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

# ट्रॅक्टर सोडण्यासाठी २० हजारांच्या लाचेची मागणी

#### प्रांत कार्यालयातील चालकासह खाजगी पंटरला अटक

**शिरपूर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

महसूल विभागाकडून जप्त करण्यात आलेल्या वाळू ट्रॅक्टर वरील दंड भरून देखील ट्रॅक्टर सोडण्यासाठी २० हजारांची लाचेची मागणी करणाऱ्या शिरपूर प्रांत कार्यालयातील चालकासह खाजगी पंटरला नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहिती नुसार तक्रारदार यांच्या अवैध वाळू वाहतूकीचे ट्रॅक्टरवर डिसेंबर २०२३ साली महसूल विभागाने जप्त केला होता.या जप्त करण्यात आलेल्या वाळूच्या ट्रॅक्टर वर दंड आकारण्यात आला होता.सदर दंड तक्रारदार यांनी भरुन देखील ट्रॅक्टर सोडण्यास नकार देऊन २० हजारांची मागणी करण्यात आली. यात तक्रारदार यांनी नाशिक येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाला तक्रार केली. या प्रकरणी नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तक्रारीची सहानिशा करुन तक्रारदाराकडे २० हजारांची मागणी करण्यात आल्याचे दिसून आले त्यावरून नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने खाजगी इसम बॉबी सनेर आणि प्रांताधिकारी कार्यालयातील शासकीय चालक मुकेश विसपुते याला ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी शिरपूर शहर पोलिस स्टेशनात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# संरक्षण साहित्य उत्पादन हब उभारण्यातील अडचणी दूर



#### आ. देवयानी फरांदे यांची यशस्वी मध्यस्थी

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

नाशिकमध्ये संरक्षण साहित्य उत्पादन हब (डिफेन्स क्लस्टर) उभारण्याकरिता दिंडोरीत नव्याने संपादित केलेल्या अक्राळे किंवा येवल्याजवळील चिचोंडी येथील जागेचा विचार केला जात होता. याच अनुषंगाने उद्योग मंत्रालयाने एमआयडीसीला २५ मे २०१९ रोजी पत्र पाठवून या जागांवर असा क्लस्टर शक्य आहे का? याचा अभ्यास अहवाल मागविला होता. यामुळे 'मेक इन नाशिक'च्या पार्श्र्वभूमीवर डिफेन्स क्लस्टरकरिता सरकारी पातळीवरील हालचाली सुरू झाल्याचे झालेल्या होत्या.

एमएसएमई डिफेन्स एक्सपो, पुणे येथील उद्घटनात उद्योगमंत्री यांनी पुणे, रत्नागिरी, शिर्डी व नागपूर येथील संरक्षण साहित्य उत्पादन हब (डिफेन्स क्लस्टर) ची घोषणा केली. त्यामुळे नाशिकवर अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली होती. आ. देवयानी फरांदे यांनी तातडीने सदर बाबीकडे लक्ष देऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास सदर बाब आणून दिली. तसेच उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याशी देखील चर्चा केली. यानंतर नाशिक येथील संरक्षण साहित्य उत्पादन हब (डिफेन्स क्लस्टर) तयार करण्यातील तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या. आगामी दोन ते तीन दिवसात नाशिक येथील संरक्षण साहित्य उत्पादन हब (डिफेन्स क्लस्टर) ची घोषणा करण्यात येवून स्काय बसचा प्रकल्प देखील राबवण्यात येणार असल्याचे आश्र्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले. आ. देवयानी फरांदे यांनी तात्काळ उचललेल्या पावलांमुळे व केलेल्या कार्यवाहीमुळे नाशिकमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याने याबाबत समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### आयुष्य संपविण्याचा केला प्रयत्न; तरुणाची कारागृहात रवानगी

**नाशिक ।** जिल्हा परिषद मुख्यालयाच्या छतावर चढून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाची कारागृहात रवानगी करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याविरोधात ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी अनिकेत प्रवीण निकाळे याने मुख्यालयाच्या छतावर जात अंगावर पेट्रोल ओतून जाळून घेण्याची धमकी देत आत्महत्येचा प्रयत्न केल्याने कार्यालयात एकच धावपळ उडाली होती.

# मराठी भावगीतांनी गाजवला महासंस्कृती महोत्सवाचा दुसरा दिवस

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई जिल्हा प्रशासन, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाच दिवसीय महासंस्कृती महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी भरतनाट्यम, खान्देशी नृत्य, आपली मायबोली अहिराणी गीत, आयुष्यावर बोलू काही या कार्यक्रमांनी गाजविला. या कार्यक्रमांना धुळेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता विवेक नवले, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, जिल्हा पुरवठा अधिकारी महेश शेलार, उपजिल्हाधिकारी सिमा अहिरे, मनपा उपायुक्त संगीता नांदुरकर, तहसिलदार पंकज पवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व धुळेकर नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बालन सर व सहकारी यांनी भरतांजली भरतनाट्यम नृत्य, जितु नगराळे, मुकेश तायडे, राहुल मंगळे, विकी माळीच, दिपक साळुंखे, आकाश वाघ, मयुर गुळवे, राज वाघ यांचा खान्देशी नृत्य अविष्कार, एस.व्ही.के.एम.स्कुल, धुळेच्या विद्यार्थ्यांचे महाराष्ट्राची संस्कृती नृत्य, महादेव बम बम भोले.., खान्देश किंग ग्रुप बजरंग बॅण्ड, शिरपूरचे आबा चौधरी, धिरज चौधरी यांचे आपली मायबोली खान्देशी अहिराणी गीतांनी मैफलीत चांगलाच रंग भरला.

# नाशिकमध्ये आंदोलक आदिवासी शेतकरी आक्रमक

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**


राज्य सरकारशी चर्चा निष्फळ ठरल्यानंतर बुधवारी आदिवासी शेतकरी, शेतमजुरांनी आक्रमक भूमिका घेत जिल्हाधिकारी कार्यालयाची घेराबंदी अधिक भक्कम करत अधिकारी आणि नागरिकांचा प्रवेश रोखला. यामुळे या कार्यालयात प्रवेश करणे अवघड झाले. अधिकारी-कर्मचाऱ्यांना जिल्हा न्यायालयाच्या बाजूकडील लहानशा प्रवेशद्वारातून मार्गक्रमण करावे लागत आहे. दुसरीकडे काही आंदोलकांनी सीबीएस चौकात ठिय्या देत वाहतूक बंद पाडली. या घटनाक्रमाने पोलीस यंत्रणेची तारांबळ उडाली.

वनहक्क कायद्याची अंमलबजावणी, कांदा निर्यात सर्व देशात खुली करावी, यांसह विविध मागण्यांविषयी मुंबईतील बैठकीत नेहमीप्रमाणे केवळ आश्र्वासने दिली गेल्याने माकप आणि किसान सभेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असणारे आंदोलन यापुढेही कायम ठेवण्याचा निर्धार जाहीर केला आहे. राज्य सरकार आणि आंदोलक यांच्यात मंगळवारी मुंबईत झालेली चर्चा निष्फळ ठरल्यानंतर बुधवारी सकाळपासून आंदोलक अधिक आक्रमक झाले. महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर ठिय्या देत प्रवेशाला विरोध केला. प्रारंभीचे दोन दिवस शांततेने चाललेले आंदोलन हळूहळू तीव्र होत असल्याचे चित्र दिसत आहे.

# वडणे येथील प्राथमिक शिक्षक निलंबित; सीईओ गुप्तांकडून कारवाई

**धुळे ।** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या मिशन उत्कर्ष कार्यक्रमात दुर्लक्ष व निष्काळजीपणा केल्याप्रकरणी वडणे (ता. धुळे) येथील जिल्हा परिषद शाळेचे प्राथमिक शिक्षक मिलिंद मधुकर चौधरी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. सीईओ शुभम गुप्ता यांच्या या कारवाईमुळे शिक्षकांचे धाबे दणाणले आहे.

जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होण्यासाठी जुलै-२०२३ पासून मिशन उत्कर्ष हा उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी सातत्याने जिल्हास्तरावरून पाठपुरावा केला जात होता. ३१ मार्च २०२४ पर्यंत विद्यार्थ्यांच्या सध्याच्या स्तरावरून वाढ करून त्यांना असर स्तरापर्यंत पोचविणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.






## युद्ध संपेना...!

अमेरिकेच्या पुढाकाराने रशियावर अनेक निर्बंध लादले गेले आहेत. अशावेळी भारताने स्वहित लक्षात घेऊन रशियाकडून तेल खरेदी सुरु ठेवली, याबाबत अमेरिकेसह युरोपीय देशांच्या नाराजीची पर्वा केली नाही.

रशिया-युक्रेन युद्धाला नुकतीच दोन वर्षे पूर्ण झाली. एवढ्या कालावधीनंतरही युद्ध निर्णायक टप्प्यावर आले आहे, असे म्हणण्यासारखी स्थिती नाही. याचे कारण दोन देशांमधील युद्धात पडद्यामागून सहभागी झालेल्या देशांचे हितसंबंध. विशेषतः अमेरिका आणि नाटो संघटनेतील अमेरिकेच्या सहकार्यांनी, रशियाचा प्रभाव संपविण्याची संधी, याच दृष्टीने युद्धाकडे पाहिले. आक्रमणाचे पाऊल रशियाने उचलले असले तरी युक्रेनला नाटो राष्ट्रांकडून सातत्याने मिळालेली फूस युद्धाला निमंत्रण देणारीच होती. इस्त्रायल आणि हमास यांच्यातील लढाईत पॅलेस्टिनची होरपळ सुरु आहे. सीरिया, इराण अमेरिकेचे लक्ष्य ठरत आहेत. युक्रेन आणि हमासच्या निमित्ताने झालेली जगाची अप्रत्यक्ष वाटणी महायुद्धाला कारण ठरु शकते, हा धोका तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. रशियाविरुद्धच्या युद्धात युक्रेनने आतापर्यंत ३१ हजार सैनिक गमावले, असे त्या देशाचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी जाहीर केले. याशिवाय किती नागरिकांचा बळी गेला, हे अद्याप स्पष्ट झालेलेच नाही. आपले सहा सैनिक ठार झाल्याचे रशिया सांगतो. मात्र, अमेरिकेच्या गुप्तहेर विभागाच्या माहितीनुसार ठार झालेल्या सैनिकांची दोन्ही देशांमधील संख्या काही लाखांच्या घरात आहे. रशियाने केलेले आक्रमण युक्रेन फार काळ सहन करु शकणार नाही, अशी अटकळ प्रारंभी व्यक्त केली गेली. अमेरिका, ब्रिटनसह युरोपीय देश, ऑस्ट्रेलिया, जपान यांच्या मदतीच्या आधारावर युक्रेनने रशियाला जेरीस आणले. युक्रेनच्या प्रतिकारामुळे रशियाला युक्रेनच्या केवळ अठरा टक्के भूभागावर कब्जा करता आला आहे.

जुन्या सोव्हिएत महासंघाचा विस्तार महाप्रचंड होता. सोव्हिएत महासंघ लयाला गेले खरे; पण ब्लादिमिर पुतीन यांना ती वस्तुस्थिती मान्य नाही. युक्रेन हा आमचाच भाग आहे, ही भूमिका घेत आणि स्वायत्ततेची मागणी करणार्यांवर युक्रेनमध्ये अत्याचार होत आहेत, असा आरोप करत त्यांनी युद्धाला सुरुवात केली. युक्रेनच्या तुलनेत रशियाची बाजू उघडपणे घेणार्या देशांची संख्या मोजकीच आहे. इराण, उत्तर कोरिया यांनी रशियाला पाठिंबा दिला. चीनने मदतीची भूमिका घेतली. अर्थात, चीनची भूमिका अमेरिकेला उत्तर होते. नाटोच्या युक्रेनला असलेल्या मदतीमुळे रशिया अडचणीत आला आणि अगदी अलीकडे इस्त्रायल - हमास युद्धाची धग वाढून अमेरिकेचीही अडचण वाढली आहे. भरभक्कम पाठबळाशिवाय हमासने इस्त्रायलवर हल्ल्याचे धाडस केले नव्हते हे उघड आहे आणि हल्ल्याचे उद्दिष्ट अमेरिकेला यात खेचून घेणे हे होते, तेही स्पष्ट झाले. युक्रेन साम्राज्यवाद, विस्तारवादाला विरोध असे मुद्दे पुढे करून लढत आहे आणि त्याला मदत करणारे किती 'लोकशाहीवादी' आहेत, हे सुद्धा वेळोवेळी जगाने पाहिले. अमेरिका, कॅनडा यांच्या सोयीच्या भूमिकांचा अनुभव भारतानेही घेतला आहे. युद्धात आतापर्यंत रशियाची सरशी झाली, असे वरकरणी दिसत असले तरी त्या देशासमोर मनुष्यबळाचे संकट उभे राहणार आहे. रशियाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा आजचा वेग ५.५ टक्के असला तरी निर्बंधांचे परिणाम पुढच्या काळात दिसल्याशिवाय राहणार नाहीत. अमेरिकेच्या अध्यक्षांनी युक्रेनला भेट दिली. अमेरिकेने दुसर्या देशांच्या प्रश्नांमध्ये किती गुंतावे, असा प्रश्न तेथील अध्यक्षीय निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जोर धरु लागला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांची समंजसपणाबद्दल ख्याती नसली तरी नाटोसंदर्भात त्यांनी सांगितलेल्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. रशिया - युक्रेन युद्धाचा सर्वाधिक फायदा चीनला होत आहे. रशिया आणि अमेरिका यांचा प्रभाव जेवढा कमी होईल तेवढे आपले वर्चस्व वाढेल, हे चीन जाणून आहे. सुदैवाने व्यापार अथवा विकास प्रकल्पांच्या नावाखाली जग जोडू पाहणार्या चीनचा कावा अनेक देशांच्या लक्षात आल्याने ते सावध झाले. परिस्थिती आणखी स्फोटक होण्यापूर्वी युद्ध संपावे आणि भविष्यात जागतिक अर्थव्यवस्थेचा श्वास घोटला जाण्याचा धोका टाळला जावा, हीच अपेक्षा आहे.

## पंतप्रधान मोदींचा ध्यास, होतोय रेल्वेचा कायापालट

काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत प्रवास करायचा असेल तर देशातील सर्वसामान्य नागरिकांना तुलनेने स्वस्त आणि सुरक्षित वाहनाचे साधन कोणते असे विचारले, तर चटकन डोळ्यांसमोर रेल्वे उभी राहते. हवाई प्रवास हा सर्वांच्या खिशाला परवडणारा नसतो. त्यामुळे ज्या भागापर्यंत रेल्वे पोहोचलेली आहे, त्या परिसरात विकास झाल्याचेही दिसून आलेले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुढील काही वर्षांत होणारे बदल आणि दूरदृष्टी ठेवून अमृत भारत स्थानके योजनेअंतर्गत रेल्वेचा कायापालट करण्याचे ठरविले आहे. त्याचाच एक भाग म्हणून सोमवारी पंतप्रधानांच्या हस्ते ४१ हजार कोटी रुपयांच्या देशभरातील सुमारे दोन हजारांहून अधिक रेल्वेविषयक पायाभूत सुविधा प्रकल्पांची कोनशीला, उद्घाटन आणि लोकार्पण सोहळा संपन्न झाला. त्यात १९ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या ५५३ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाचे कार्य केले जाणार आहे. एकाच वेळी दोन हजार प्रकल्पांना गती मिळल्यास भारताच्या रेल्वेविषयक पायाभूत सुविधांमध्ये भव्य परिवर्तन आगामी काळात पाहायला मिळणार आहे.

ब्रिटिश काळात भारतीय रेल्वेच्या इतिहासाकडे पाहताना सुंदर गोष्ट समोर येते. उष्णतेपासून सुटका मिळवण्यासाठी ब्रिटिशांना डोंगरांमध्ये जायला आवडत असे. तेथे लवकरात लवकर पोहोचता यावे म्हणून त्यांनी डोंगराळ भागांसाठी चिमुकल्या झुकझुक गाड्या बनवल्या. त्यामुळे, घोड्यावर जाण्यापेक्षा किंवा पालखीत बसून जाण्यापेक्षा हा प्रवास लवकर करता येऊ लागला. उदाहरणार्थ, दक्षिण भारतातील चिमुकली झुकझुक गाडी प्रवाशांना निलगिरी डोंगरांमध्ये किंवा निळ्या पर्वतांमध्ये घेऊन जात होती. ती ताशी १०.४ किलोमीटर वेगाने धावत होती आणि ती भारतातली सर्वात हळू जाणारी रेलगाडी असावी, असे बोलले जाते.

१९०० सालापर्यंत, भारतातील लोहमार्ग व्यवस्था जगातील पाचव्या क्रमांकाची होती. वाफेवर, डिझेलवर आणि विद्युतशक्तीवर चालणारी इंजिने आणि प्रवासी डबे असलेल्या गाड्या पूर्वी आयात केल्या जात होत्या; परंतु आता स्थानिकरीत्या तयार केल्या जाऊ लागल्या आहेत. मुंबई उपनगरातील रेल्वे, जगातील सर्वात मोठे जाळे असून सुमारे ७५ लाखो प्रवाशांची ने-आण करते; तेथील



गाड्या कायम खच्चाखच भरलेल्या असतात. कोलकाता येथील भूमिगत मेट्रोने दररोज १७ लाख प्रवासी प्रवास करू शकतात. चेन्नई (पूर्वीचे मद्रास) येथे भारतातील सर्वात पहिला उंचावर बांधलेला लोहमार्ग आहे. कॉम्प्युटराईझ्ड बुकिंग आणि मल्टीमीडिया माहिती केंद्रे यांची भर अलीकडे पडली आहे.

रेल्वे स्थानकांवर जागतिक दर्जाच्या सुविधा देण्याच्या महत्त्वावर पंतप्रधानांनी नेहमीच भर दिला आहे. एकूण २७ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ही रेल्वे स्थानके असून, शहराच्या दोन्ही टोकांना जोडणारी 'सिटी सेंटर्स' म्हणून काम करतील, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. या रेल्वे स्थानकांवर रूफ प्लाझा, सुंदर लँडस्केपिंग, इंटर मोडल कनेक्टिव्हिटी, आधुनिक दर्शनी भाग, मुलांसाठी खेळण्याचे क्षेत्र, दुकाने, फूड कोर्ट इत्यादी आधुनिक प्रवासी सुविधा असतील. या रेल्वे स्थानकांचा विकास पर्यावरणपूरक आणि दिव्यांग स्नेही म्हणून केला जाईल. स्थानकांमधील इमारतींची रचना स्थानिक संस्कृती, वारसा आणि स्थापत्यकलेपासून प्रेरित असेल, यावर भर देण्यात आलेला आहे.

विशेष म्हणजे या स्थानकांचा पुनर्विकास करताना पुरातन वारसांची प्रतीके जपण्याचा प्रयत्न केला आहे. ओडिशातील बालेश्वर स्थानकाची रचना भगवान जगन्नाथ मंदिराच्या संकल्पनेनुसार करण्यात येणार आहे. सिक्कीमच्या रंगपो स्थानकावर स्थानिक वास्तुकलेचा प्रभाव दिसणार आहे. राजस्थानमधील सांगनेर स्थानकावर १६ व्या शतकातील हँड-ब्लॉक प्रिंटिंग प्रदर्शित असणार आहे. तामिळनाडूमधील कुंभकोणम येथील स्थानक चोल काळातील वास्तुकला प्रदर्शित करेल आणि अहमदाबाद स्थानक मोढेरा सूर्य मंदिरापासून प्रेरित आहे, द्वारका स्थानक द्वारकाधीश मंदिरापासून प्रेरित आहे, आयटी सिटी गुरुग्राम स्थानक आयटीसाठी समर्पित असणार आहे. तसेच ही स्थानके विकसित करताना दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांचा विचार करण्यात आला आहे.

गेल्या १० वर्षांत विकसित भारताची उभारणी करण्याच्या दिशेने केंद्र सरकारच्या माध्यमातून प्रयत्न केला जात आहे. त्यात विशेषत: रेल्वेमध्ये हे बदल दिसून येत आहेत. वंदे भारत, अमृत भारत, नमो भारत यांसारख्या आधुनिक सेमी हाय-स्पीड गाड्या, रेल्वे मार्गांच्या विद्युतीकरणाचा वेग आणि गाडीच्या आत आणि स्थानकाच्या फलाटावरील स्वच्छता ही उदाहरणे डोळ्यांसमोर आहेत. त्यामुळे ज्या सुविधा एकेकाळी अशक्य वाटत होत्या, त्या आता प्रत्यक्षात उतरल्या आहे. विमानतळावर असलेल्या आधुनिक सुविधांसारख्याच सुविधा आता देशातील गरीब आणि मध्यमवर्गासाठी रेल्वे स्थानकांवर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे भविष्यात नागरिकांसाठी रेल्वे हा सुलभ प्रवासाचा मुख्य आधार होणार आहे. भारतीय रेल्वे ही केवळ प्रवाशांसाठीची सुविधा नाही, तर ती भारताच्या कृषी आणि औद्योगिक प्रगतीची सर्वात मोठी वाहक असणार आहे. त्यामुळे करदात्यांच्या पैशातील प्रत्येक पैसा प्रवाशांच्या कल्याणासाठी वापरला जात आहे, याची ग्वाही पंतप्रधानांकडून देशवासीयांना मिळाली आहे. वेगवान रेल्वेमुळे वाहतुकीचा वेळ वाचेल आणि उद्योग क्षेत्राचा खर्चही कमी होईल आणि पर्यायाने मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारताच्या उद्दिष्टाला चालना मिळणार आहे. भारत हे गुंतवणुकीसाठी जगाच्या आकर्षणाचे केंद्र आहे. त्याचे कारण इथल्या आधुनिक पायाभूत सुविधांना देण्यात येते. पुढील ५ वर्षांत देशातील हजारो रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण झाल्यावर भारतीय रेल्वेची क्षमता सुधारेल आणि देशात गुंतवणुकीची मोठी क्रांती घडेल, यात तिळमात्र शंका नाही.

## कुटुंबाला भोवते आहे वैचारिक दारिद्र्य

समुपदेशनाच्या अनेक प्रकारच्या केसेस सोडावताना, स्त्री, पुरुष, मुलं, कुटुंबातील अन्य व्यक्ती यांच्याशी सखोल चर्चा करताना काही बाबी प्रकर्षाने जाणवतात. केसच्या आनुषंगाने पती - पत्नी, मुले यांच्याशी तर बोलावे लागतेच पण त्याही पलीकडे जावून जेव्हा आपण त्यांनी सांगितलेल्या माहितीच्या आधारे, त्यांना होत असलेला घरातील इतर व्यक्तींचा त्रास लक्षात घेऊन, त्यांच्या घरातील इतर नातेवाईक अथवा लोकांशी चर्चा करतो तेव्हा लक्षात येते की, कुटुंब विस्कळीत व्हायला कारणीभूत ठरते ती घरातील लोकांची कमकुवत विचार शैली, उथळ स्वभाव, अर्धवट ज्ञान, इतरांबद्दल मत बनविण्याची घाई, अति राग, अति द्वेष, मत्सर, जळाऊ वृत्ती, तिरस्कार आणि सतत आपापसात केलेली तुलना. स्वतःच्या अनुभवातून मत बनवणे, निर्णय घेणे, परिस्थितीचा सर्वांगीण अभ्यास करणे, दुसऱ्याचे ऐकून घ्यायला कमीपणा वाटणे, वास्तवापेक्षा ऐकिव माहितीवर पटकन विश्वास ठेवून खोट्या चुकीच्या वृत्तींना अधिक फोफावण्यासाठी खतपाणी घालणे.

सून नांदायला येत नाही, अशी तक्रार घेऊन जेव्हा सासू, नणंद अथवा नवरा येतो तेव्हा तिच्या अगणित चुकांचा पाढा वाचून दाखवला जातो. तिच्यामध्ये अनेक खोड्या काढून ती कशी आणि किती वाईट आहे हे सगळे सांगितले जाते. मग सून जर इतकी वाईट आहे हे तुम्ही स्वतः सांगताय, ठरवताय तर तुम्हाला ती परत नांदायला कशाला हवी आहे? परत तिला का बोलवायचे आहे? यालाच आपण वैचारिक दिवाळखोरी म्हणू शकतो. ज्या केसमध्ये पत्नी नवऱ्याची तक्रार सांगते त्यावेळी त्याचे सर्व अवगुणच सांगते. त्याच्यापासून होणारा त्रासच सांगते. त्याच्यात एकही चांगला गुण नसेल का की तो तुम्ही अभिमानाने सांगू शकता? मग असा इतका दुर्गुणी माणूस तुम्ही नवरा म्हणून का निवडला? की लग्न झाल्यावर तो इतका नालायक सिद्ध झाला?

कौटुंबिक समस्या सोडवताना प्रकर्षाने जाणवणारा मुद्दा असतो घरातील लोकांनी एकमेकांना माघारी बोलणे आणि त्यातून निर्माण झालेला प्रचंड मोठा वैचारिक गुंता. आपण केस संदर्भात काहीही माहिती विचारल्यास लोकांची उत्तरे असतात तो म्हणत होता, ती सांगत होती, यांच्याकडून समजले, हा बोलला, तो बोलला, माझ्या कानावर आले. लोकांकडे फक्त ऐकीव डाटा उपलब्ध असतो हा डाटा खरा किती, खोटा किती याबद्दल त्यांना स्वतःलाच माहीत नसते. ऐकीव माहितीच्या आधारित सर्व अवलोकन केलेले असते. बरं तो डाटा म्हणजेच माहिती पण सुसंगत सुसूत्र असते असे नाही तर ती दहा ठिकाणावरून मिळालेली असते.

घरातीलच लोकांकडे एकमेकांबद्दल असलेल्या कोणत्याही माहितीला काहीही सबळ पुरावा, काही ठोस पार्श्वभूमी नसते, कोणत्याही वाक्याला गांभीर्य नसते. घरातील अत्यंत महत्त्वाच्या, संवेदनशील, तातडीच्या, भविष्यात त्रासदायक ठरणाऱ्या विषयावर काय कशी भूमिका घेणे योग्य राहील याबद्दल थोडा सुद्धा विचार कोणीही केलेला नसतो. घरातील आर्थिक व्यवहार, आर्थिक जबाबदाऱ्या, मुलांचे भवितव्य, आजारपण, घरातील लोकांची आर्थिक बचत यांमध्ये कुठलेही गांभीर्य नसते. त्यामुळे कोणतीही आर्थिक समस्या उभी राहिल्यावर एकमेकांना दोष देणे, हात वर करणे असे प्रकार घडतात.

एकमेकांबद्दल बोलणे, दोष देणे, आरोप करणे, कोणाची बदनामी करणे यात पूर्ण आयुष्य गेलेली व्यक्ती उतार वयात सुद्धा बदललेली नसते हे पाहून सुद्धा आश्यर्य वाटल्याशिवाय राहत नाही. अनेक ज्येष्ठ, साठी ओलांडलेले लोक सुद्धा बिनबुडाचे विधान करताना दिसतात. स्वतःच्या चुकांना स्वीकारताना त्यांना कमीपणा वाटतो. एकाच घरातील लोक एकमेकांना किती खालच्या दर्जाचे बोलू शकतात, कसे अपशब्द वापरू शकतात, घरातच लोकांना आपापसात आदर नाही हे पाहिल्यावर जाणवते की यांना अजून आयुष्याची संकल्पनाच समजली नाही. आपल्याच माणसांबद्दल जर




आपणच इतके पातळी सोडून बोललो आणि वागलो तर आपले शिक्षण, संस्कार, सुसंस्कृतपणा, पैसा, श्रीमंती आणि बडेजाव सगळे व्यर्थ आहे हेच लोकांना समजत नाही.

अनेक सुशिक्षित कुटुंबे अनेक कारणांनी उद्ध्वस्त होताना आपण बघतोय. कोणाचा कोणाशी ताळमेळ नसल्यासारखे, कोणालाच कोणाची किंमत नसल्याने, फक्त स्वतःला कसा त्रास होणार नाही हे पाहून अनेकजण चालत असतात. कुटुंबात कितीही गंभीर, बिकट समस्या असली तरी मी कसा बरोब्बर आहे, माझ्यामुळे काहीच घडलेले नाही, माझा काहीच संबंध नाही हे पटवून देण्याचा प्रयत्न करतात. स्वतःची बाजू सुरक्षित करण्यात, अलिप्त राहण्यात जर तुम्हाला धन्यता मानायची असेल, तर अशा लोकांनी कोणाबद्दल काहीच मत मांडणे योग्य नाही. तटस्थ भूमिका घ्यायची असेल, तर एकदमच शांत आणि गप्प राहणे अपेक्षित आहे. समस्या अंगावर घ्यायची नाही, समस्या सोडवायची नाही मग त्याबद्दल स्वतःचे ज्ञान का पाजळावे? हे लोकांना कळत नाही.

**(क्रमशः )**

## शब्दकोडे-३३३



**आडवे शब्द**

१.धन्यवाद ३. नवरत्नांपैकी चार १०. आमंत्रक, कार्यप्रमुख १२. क्रिकेटमधील धाव १३. सांघिक परेड १५. आश्चर्य १७. धैर्य, हिंमत १८. सुरुवातीचा, मूळ १९. सफल २१. पायंडा, प्रथा २३. बागबगीचा २४. वर्तमानपत्रातील स्तंभ २५. साडी २६. गाणे म्हणणाऱ्या प्रत्येकाला या उपाधीने संबोधता येत नाही! २८. पोट २९. बारा वर्षांचा काळ ३०. बस्तान ३१. भीती ३३. आईचा भाऊ ३४. प्रेम, पैसा ३६. ठाणे परिसरातील आदिवासी जमात ३७. कोवळी फांदी ३९. बरोबर काम करणारा ४१. विष ४२. तफावत, फरक ४४. हार, माळ ४५. जलद गतीने जाणारा ४७. फणसातील खाण्याचा भाग ४८. उलटसुलट चर्चा ४९. सडसडीत ५१. पूर्ण भरतीची वेळ ५२. रक्षण करणारा ५४. अंगावरील बारीक केस ५५. विनासायास, विनाकारण ५६. परग्रहावर जाणारे वाहन ५९. धनी ६१. व्यवस्था, प्रशासन ६२. कन्या, मुलगी ६४. लत्ताप्रहार ६६. रसदार ६९. वाचण्यास योग्य ७१. प्रफुल्लित, ताजे ७३. पंजाबमधील एक नदी ७५. हात ७६. केर ७७. उपहास, फजिती ७८. चिंतन ७९. रामाला वाहिली जाणारी सुगंधी वनस्पती ८०. तंबाखूचे सुगंधी चूर्ण

**उभे शब्द**

१. बैठक, स्थान २. रात्रंदिवस ३. बर्फाळ पर्वतराजी ४. अरण्य ५. कधी हा नथीतून मारला जातो! ६. सन्मानाची अल्प रक्कम ७. लोणच्यासाठी कैरी अशी हवी ८. बारीक खिळा ९. धोकादायक ११. संत तुकारामांच्या अभंगात सुखाचे मोजमाप करणारे धान्य! १४. सवाद्य, आनंदाने १६. नाकारणे १८. पाणी २०. दिवाळीतील ऋतू २२. हाताचा भविष्य दर्शवणारा भाग २३. प्रकाश २५. पातक २७. कवितेत शब्दाला जुळणारा शब्द २८. पार्वती २९. सिद्धता ३२. रड्या मनुष्य ३३. बनकर ३४. कोकणीत 'मला' ३५. पोलिस, ४३. दरडणे, शोषण करणे ४८. सर्वस्व ४९. मणका ५०. वाईट इच्छा ५१. आकड्यांच्या जुगाराचा एक प्रकार ५२. राजा ५४. गंध ५६. काटकसर ५७. काळीमा, बट्टा ५९. मृत्तिका ६१. वलयांकित दुनियेतील प्रसिद्ध मराठी छायाचित्रकार- अतुल ----- ६३. वस्ती ६६. आई ६७. जर बरोबरचा शब्द ६८. चर्चा ७०. शीख धर्माचे संस्थापक ७२. मवाळ ७३. अरण्य ७४. गाणे ७५. पोळ्या भाजण्याचे पात्र ७८. होड्यांचा थांबा

### शब्दकोडे-३३२ चे उत्तर

**● आडवे उत्तर**

१. नयन ३.कविता ६.कमतरता १०.सोगा १२.परतपरत १४.शीतपेय १६.नवरानवरी १९.वापर २१.खातरजमा २४.पसा २५.तपन २६.तमासगीर २८.नवा ३०.सान ३१.वाकडसर ३२.लगट ३५.परका ३७.पंख ३८.पत्रकारपरिषद ४२.दामोदर ४४.रव ४५.टणत्कार ४६.कसर ४७.पत ४९.करवा ५१.मनन ५३.दीनवाणा ५५.सकटनिकट ५८.रमारम ६०.मस ६१.कनात ६२.लंकाधिपती ६३.वन ६४.खास ६५.रमा ६७.तम ६९.साधना ७१.बेताबेताने ७३.जंगी ७५.तरस ७६.हनन ७७.गतवधा ७९.कसरत ८०.मस्तवाल ८१.खोत

**● उभे उत्तर**

१.१.नवीन २.नखरा ४.विपरीत ५.तार ६.कप ७.मरवा ८.ततपप ९.तारा १०.सोपे ११.गायरान १३.तनुज १५.तळतळाट १७.वर्तमानपत्र १८.वखार २०.रसातल २२.रक्षक २३.मानस २६.तसा २७.गीतकार २९.वारसदार ३३.गजर ३४.नरवर ३६.रकाना ३७.परसदार ३८.पदोपदी ३९.पदर ४०.षट ४१.दणकट ४३.दमन ४८.तनमनधन ४९.कणा ५०.वासना ५२.नरपती ५४.वास ५६.कतरबेत ५७.कलंक ५९.मती ६१.कसबेकर ६३.वसाहत ६६.माता ६७.तर ६८.मसलत ७०.नानक ७२.नेमस्त ७३.जंगल ७४.गीत ७५.तवा ७८.धक्का

## पैज

या जगात भुतं-खेतं नसतात हे त्याला आपल्या मित्रांना दाखवून द्यायचं होतं.

तो हळूहळू स्मशानाच्या दिशेने पुढे निघाला. स्मशानभूमीत उंचावर एक मंद दिवा मिणमिणत होता. त्या दिव्याखालीच बसून रात्र काढूया, असा विचार त्याने केला. आजूबाजूची जागा साफ करून तो तिथेच बसला. त्याच्या समोरच एक प्रेत जळत होतं. त्या जळणाऱ्या प्रेताकडे बघत विजय विचार करू लागला. काय वेडी लोकं आहेत.



म्हणे स्मशानात भुतं असतात अन् तेवढ्यात प्रेताची कवठी फुटल्याचा मोठा आवाज आला. तो आवाज ऐकून विजयच्या अंगावर सर्रकन काटा आला. समोरचे प्रेत आणखी जोरात जळू लागले. आता मात्र विजय अंग चोरून बसला. तेवढ्यात त्याच्या डोक्यावरून कुणीतरी हात फिरवत असल्याचा त्याला भास झाला. त्याने झर्रकन मान फिरवली. पण त्याला कुणीच दिसले नाही. दोन मिनिटे शांततेत गेली अन् पुन्हा कुणीतरी पाठीवरून हात फिरवत असल्याचा भास त्याला झाला. आता मात्र विजय चांगलाच घाबरला. तो झटकन उठला अन् मागे वळून पाहू लागला. पण त्या मिट्ट अंधारात त्याला कुणीच दिसले नाही. घड्याळात आताशी मध्यरात्रीचे २ वाजले होते. तो पुन्हा खाली बसला. तोच समोरून कुणीतरी धावत गेल्याचे त्याने पाहिले अन् तो ओरडला, कोण आहे रे तिकडे? आता अंधारातून हसण्या-खिदळण्याचे आवाज ऐकू येऊ लागले. आता मात्र विजयची बोबडीच वळली. तो स्मशानातून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. पण पळण्याच्या प्रयत्नात तो धाडदिशी आपटला. नेमका डोक्यावरच आपटल्याने त्याची शुद्ध हरपली. मग कितीतरी वेळ तो तसाच पडून होता. विजयला जाग आली तेव्हा त्याने पाहिले की, तो एका हॉस्पिटलात भरती झाला आहे. पैज लावणारे मित्र बाजूलाच बसले होते. अन् विजयकडे बघून गालातल्या गालात हसत होते. विजय काही बोलणार तोच विजयचे मित्र त्याला म्हणाले, अरे विजय तू म्हणतोस तेच खरे आहे बघ. अमावास्येच्या रात्री आम्हीदेखील तुझ्या पाठोपाठ आलो होतो. पण आम्हाला काही भूत दिसलंच नाही बघ कुठे. आता विजयच्या लक्षात आले. अरेच्चा! म्हणजे स्मशानात मला जे भास होत होते, ती या मित्रांची करामत होती तर! अन् आपण विज्ञानवादी असूनही भुताच्या जाणिवेने घाबरलो. हे कळताच विजयने खजील होऊन मान खाली घातली.

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-२५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# वाचन संस्कृती टिकविण्याबरोबरच अहिराणी भाषा संवर्धनाची गरज : ज्येष्ठ साहित्यिक रमेश बोरसे

### ग्रंथदिंडीने धुळे ग्रंथोत्सोवास सुरुवात, मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन संपन्न

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**





विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी वाढविणे आवश्यक असून वाचन संस्कृती टिकविण्याबरोबरच अहिराणी भाषा संवर्धनाची गरज असल्याचे मत ज्येष्ठ साहित्यिक रमेश बोरसे यांनी व्यक्त केले.

राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय धुळे ग्रंथोत्सवाचे उद्घाटन ग्रंथ भवन, जिल्हा ग्रंथालय कार्यालय, धुळे येथे आज मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले, यावेळी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा धरती देवरे, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, जिल्हा माहिती अधिकारी विलास बोडके, जिल्हा ग्रंथालय अधिकारी चंद्रशेखर ठाकुर, ज्येष्ठ साहित्यिक विश्राम बिरारी, प्रा. जगदीश देवपूरकर, ज्येष्ठ शाहीर लोक कलावंत श्रावण वाणी, जयहिंद महाविद्यालयाच्या उपप्राचार्या वर्षा शिंदे, उपप्राचार्य व्ही.एस.पवार, नाशिक विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.दत्ता परदेशी, राज्य ग्रंथालय संघाचे कार्यवाह अनिल सोनवणे, धुळे जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष अविनाश भदाणे, रोहीदास हाके आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक रमेश बोरसे म्हणाले की, आपली मायबोली खान्देशी भाषा पटकन सर्वांना अवगत होते. खान्देशातील अहिराणी भाषेला राजभाषेचा मान मिळावा अशी अपेक्षा व्यक्त करुन वाचनसंस्कृती टिकवायची असेल तर प्रत्येक शाळेत वाचनाचा तास घ्यायला पाहिजे. जेणेकरुन विद्यार्थ्यांची वाचन क्षमता वाढेल. आजच्या प्रगत आणि डिजिटल युगात ज्याप्रमाणे मराठी, इंग्रजी या भाषेचे ज्ञान आवश्यक आहे त्याचप्रमाणे आपल्या बोली भाषेचा विकास होणे आवश्यक आहे. खान्देशात अनेक भाषा आहेत या सगळ्या भाषांना गुंफणारा मुख्य दुवा म्हणजे अहिराणी भाषा आहे. म्हणून खान्देशची मुख्य भाषा अहिराणीचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. त्याचप्रमाणे आपल्या खान्देशाला साहित्यिकांचा मोठा वारसा आहे. या खान्देशात अनेक कवी, लेखक, साहित्यीक होवून गेले आहे यांचा परिचय करुन देण्याची गरज असल्याचे त्यांनी सागितले. जि.प.अध्यक्षा श्रीमती देवरे म्हणाल्या की, आजच्या डिजिटल युगात विद्यार्थी मोबाईलमध्ये जास्त वेळ असतात. त्यांना काही आवश्यक माहिती पाहिजे असल्यास ती माहिती गुगलवर सहज उपलब्ध होत असते. परंतू चांगले ज्ञान मिळवण्यासाठी ग्रंथांना आणि वाचनाला पर्याय निर्माण होवू शकलेला नाही. पुस्तकातून जी परिपूर्ण माहिती मिळते ती सोशल मीडियाच्या माध्यमातून मिळू शकत नाही त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचन करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषेदेतील शाळेत दर शुक्रवार व शनिवारी वाचन तास साजरा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी श्री.गोयल म्हणाले की, डिजिटल युगात विद्यार्थी हे पुस्तकांचे वाचन कमी करतात. युवकांचा मोबाईल वापरण्यात जाणारा वेळ हा आरोग्यासाठी तसेच भावी पिढीसाठी धोकादायक असून पुस्तक वाचन करणे ही काळाची गरज आहे. वाचन, लेखन, क्षमता विकसित होण्यासाठी ग्रंथोत्सवाचे महत्वपूर्ण असल्याचे ते म्हणाले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची रुची निर्माण होण्यासाठी जिल्हा परिषदेच्या प्रत्येक शाळेमध्ये शुक्रवार किंवा शनिवारी एक तास वाचन तास हा उपक्रम सुरु करावा. त्याचप्रमाणे मागील काळात जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामार्फत प्रत्येक शाळेपर्यंत ग्रंथ पोहचविण्यात येत होते. तसाच उपक्रम येणाऱ्या काळात जिल्हा ग्रंथालयांनी राबवावा, अशा सूचना त्यांनी यावेळी केल्यात. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गुप्ता यांनीही मनोगत व्यक्त केले. ग्रंथोत्सवाचा शुभारंभ ग्रथदिंडीने जयहिंद सिनियर कॉलेज, देवपूर येथे ज्येष्ठ साहित्यिक रमेश बोरसे, जिल्हा माहिती अधिकारी विलास बोडके, जिल्हा ग्रंथालय अधिकारी चंद्रशेखर ठाकुर, जयहिंद महाविद्यालयाच्या उपप्राचार्या वर्षा शिंदे, उपप्राचार्य व्ही.एस.पवार, नाशिक विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.दत्ता परदेशी, राज्य ग्रंथालय संघाचे कार्यवाह अनिल सोनवणे, धुळे जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष अविनाश भदाणे, रोहीदास हाके यांच्या उपस्थित संपन्न झाला. ही ग्रंथदिंडीत टाळ, मृदृगांसह, आदिवासी नृत्य, लेझिम नृत्य सादर करीत जयहिंद सिनिअर कॉलेज मार्गे-जयहिंद ज्युनियर कॉलेज- डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय-जिल्हा ग्रंथालय कार्यालय येथे पोहचली. या ग्रंथदिंडीत विद्यार्थ्यांसह संयोजन समितीचे सदस्य व विविध शाळा, महाविद्यालयांचे शिक्षक सहभागी झाले होते. यानंतर मान्यवरांच्या हस्ते पुस्तकांच्या स्टॉलचे उद्धटन संपन्न झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रशेखर ठाकुर यांनी तर सुत्रसंचलन पुनम बेडसे यांनी केले. यावेळी जिल्ह्यातील मान्यवर साहित्यिक, लेखक, साहित्यप्रेमी नागरीक, विद्यार्थी, मोठ्या संख्येने उपस्थित होते. याठिकाणी वाचनप्रेमींसाठी भव्य ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ, साहित्य व वाड्.मय विषयक पुस्तके विक्रीसाठी स्टॉल लावण्यात आले आहे. या ग्रंथोत्सवात सकाळी १०.०० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामुल्य प्रवेश राहणार आहे. या ग्रंथोत्सवाचा जिल्ह्यातील नागरिक, पत्रकार, विद्यार्थी, ग्रंथप्रेमी व साहित्य रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजन समितीमार्फत करण्यात आले आहे.

**ग्रंथोत्सवात आज होणारे कार्यक्रम**

**गुरुवार, २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी सकाळी ११ ते १२ वाजता परिसंवाद होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.अनिल बैसाने, तर डॉ. सदाशिव सुर्यवंशी, डॉ. शशिकला पवार यांचा सहभाग असणार आहे. दुपारी १२.३० ते २ वाजता शालेय विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम. तर दुपारी २ ते ३.३० वाजता बहुभाषिक कवी संमेलनाचा कार्यक्रम होणार आहे. यात प्रभा बैकर, रमेश राठोड, कमलेश शिंदे, शाहीर श्रावण वाणी, शाहीर गंभीर बोरसे, मतीन अन्वर, दत्तात्रय कल्याणकर, अप्पा खताळ, विरेंद्र बेडसे, प्रविण पवार, गुलाब मोरे, कलाम अन्वर, पुनम बेडसे, शामल पाटील, चंद्रशेखर कासार, अरविंद भामरे, सुरेश मोरे, सुनिल पाटील हे कवी सहभागी होणार आहे. दुपारी ३.३० ते ४.३० वाजता स्पर्धा परिक्षा संदर्भात जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे हे मार्गदर्शन करणार आहे. त्यानंतर ग्रंथोत्सवाचा समारोप होईल.**

# नागपूर येथे ४ मार्चला राष्ट्रीय स्तरावरील नमो युवा संमेलन

### भाजयुमोचे राष्ट्रीय महामंत्री वैभव सिंग यांची माहिती

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



येत्या सोमवारी दि. ४ मार्च रोजी राष्ट्रीय स्तरावरील 'नमो युवा संमेलन' विद्यापीठ मैदान, नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा, रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय अध्यक्ष तेजस्वी सूर्या यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती भाजयुमोचे राष्ट्रीय महामंत्री वैभव सिंग यांनी दिली.

वसंतस्मृती, भाजप नाशिक महानगर मुख्यालय येथे आयोजित पत्रकार परिषदेत वैभव सिंग हे बोलत होते. यावेळी भाजपा नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव, प्रदेश युवा मोर्चा सरचिटणीस योगेश मैंद, राष्ट्रीय सचिव गौरव गौतम, भाजयुमो प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर, भाजप शहर उपाध्यक्ष व माध्यम विभाग प्रभारी पवन भगूरकर, नाशिक महानगर युवा मोर्चा शहराध्यक्ष सागर शेलार, नाशिक महानगर प्रसिद्धी प्रमुख राहुल कुलकर्णी आदी उपस्थित होते.

या संमेलनासाठी वैभव सिंग हे राष्ट्रीय स्तरावर प्रभारी असून ते सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. दौऱ्याचा एक भाग म्हणून ते नाशिकमध्ये आले असता त्यांनी पत्रकार परिषद घेत राष्ट्रीय

स्तरावरील नमो युवा संमेलनची माहिती दिली. या संमेलनात महाराष्ट्रातून १८ ते ३५ वयोगटातील एक लाख तरुण सहभागी होत या असल्याची माहितीही त्यांनी दिली.

दम्यान, या संमेलनाच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर भाजयुमो 'नमो युवा चौपाल' हा कार्यक्रम राबवत असून या अंतर्गत ११ हजार ३०० विस्तारक गावा-गावात जाऊन सदर संमेलनाची माहिती व निमंत्रण देत आहेत. महाराष्ट्रातील तीस हजार गावांपर्यंत पोहचून एक लाख तीन हजार बुथपर्यंत पोहचून नमो युवा संमेलनाला येतील असे सर्व नियोजन भाजयुमोने केले आहे. उत्तर महाराष्ट्रातून बारा हजार आठशे युवा तर नाशिक मधून १८०० ते २००० युवा या संमेलनात सहभागी होणार असल्याची माहिती महाराष्ट्र भाजयुमो प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांनी दिली.

# मविप्रच्या 'प्रज्ञा' केंद्राचा प्रवास हा सरस्वतीकडून लक्ष्मीकडे व्हावा

### शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे प्रतिपादन

**नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



नाशिक ही ज्ञानगंगेची नगरी असून मविप्रने उभारलेल्या प्रज्ञा केंद्राचा प्रवास हा बुद्धी आणि संपदेच्या एकत्रिकरणातून सरस्वतीकडून लक्ष्मीकडे व्हावा, असे प्रतिपादन नामवंत शास्त्रज्ञ तथा पद्मविभूषण डॉ.रघुनाथ माशेलकर यांनी केले.

डॉ.रघुनाथ माशेलकर हे काल रोजी मविप्रच्या 'प्रज्ञा' या बौद्धिक संपदा केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेच्या आयएमआरटी महाविद्यालयात बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुनील ढिकले, सरचिटणीस ड.नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, उपसभापती देवराम मोगल, सुनील खांडबहाले, संस्थेचे संचालक विजय पगार, अंबादास बनकर, अमित बोरसे, शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, डॉ. डी. डी. लोखंडे, डॉ. नितीन जाधव उपस्थित होते. या अगोदर मविप्र संस्थेच्या फार्मसी महाविद्यालय येथे प्रज्ञा या बौद्धिक संपदा केंद्राचे पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशनचे चीफ मेंटॉर विवेक सावंत, मविप्र संस्थेचे सरचिटणीस ड.नितीन ठाकरे, प्राचार्य डॉ. दिलीप डेर्ले, केंद्र समन्वयक डॉ. मृदुला बेळे यांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले.

पुढे बोलतांना डॉ. माशेलकर यांनी मविप्र संस्थेने शिक्षण हे भविष्य मानत विद्यार्थी घडवणे हे देश घडविण्याचे कार्य समजून केलेली वाटचाल अभिमानास्पद असल्याचे सांगतांना आपल्या देशात प्रचंड गुणवत्ता आहे. त्यामुळे कल्पनांना वाव आहे. येथील युवक कोणतीही अवघड गोष्ट सोपी करण्यासाठी काही ना काही कल्पना तयार करत असतात. शोध लावून अर्थार्जन करत असल्याचे त्यांनी सांगितले. पूर्वजांच्या जीवनाच्या प्रयोगशाळेतील ज्ञानाचा उपयोग नवीन ज्ञान निर्मितीसाठी करावा. यावेळी त्यांनी हळदी व बासमती पेटंटच्या मागील कथा देखील कथन केली.

विवेक सावंत यांनी मविप्र संस्थेने नॉलेज पॉवर होण्याकरिता प्रयत्न करावेत. तसेच मविप्र प्रज्ञा केंद्राचा प्रवास हा मानवजातीच्या पुढे येणाऱ्या चॅलेंजेसच्या दिशेने मार्गक्रमण करणारा असावा त्यासाठी एमकेसीएल मविप्र संस्थेस सर्वतोपरी सहकार्य करेल असे आश्वासन दिले.नाशिककर लवकरच पेटंटकर म्हणून ओळखले जातील असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके यांनी तर स्वागत व प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रशांत सूर्यवंशी यांनी करून दिला. केंद्र समन्वयक डॉ. मृदुला बेळे यांनी बौद्धिक संपदा केंद्राच्या स्थापनेमागील भूमिका विषद केली. याप्रसंगी ओमप्रकाश कुलकर्णी, अविनाश शिरोडे, विविध शाखांचे प्राचार्य व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

नि. ६

**जाहीर नोटीस**

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश व. स्तर सो. यांचे कोर्टात**

**कि. दिवाणी अर्ज नं.२९९/२४**

विजयकुमार गमनलाल जैन वगैरे. ....अर्जदार
अणि
शकुंतलाबाई गमनलाल जैन मयत .... जाबदेणार

ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांनी मुंबई रेग्युलेशन ॲक्ट कलम २ व ३ प्रमाणे वारस दाखला (लिगल हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणसाठी अर्ज दाखल केला असुन मयत शकुंतलाबाई गमनलाल जैन यांचे अर्जदार वारस आहेत. विवीध शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस दाखला मिळावा म्हणुन धुळे न्यायालयात वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केला आहे.

ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांचे नावे वारस दाखला मिळणेसंबधी कुणाचीही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास सदर इसमानें दि.१०/०४/२४ रोजी मे. ७ वे सह दिवाणी न्यायाधिश (क. स्तर) यांचे कोर्टात स्वत: अगर वकीलांमार्फत हजर राहुन लेखी स्वरुपात हरकत सादर करावी. सदर तारखेस कुठलीही हरकत न आल्यास सदर अर्जाचे कामी योग्य तो आदेश परीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

धुळे
दिनांक आदेशावरुन
शिक्का
**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, धुळे** **दिवाणी न्यायालय व. स्तर, धुळे**

**मुळ कागदपत्र गहाळबाबत जाहीर नोटीस**

तमांम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

१) मिळकतींचे वर्णन - तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी, नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे नाशिक शिवारातील मिळकत यांसी सर्व्हे नं २५१/१/२/१ पैकी मंजुर ले आऊट मधील प्लॉट नंबर १ यांसी क्षेत्र ५६०.०० चौ.मी., प्लॉट नं२ यांसी क्षेत्र ५२८.०० चौ.मी., प्लॉट नं ३ यांसी क्षेत्र ५३०.०० चौ.मी., प्लॉट नं ४ यांसी क्षेत्र ५५०.०० चौ.मी., यावरील बांधकाम करण्यात आलेल्या बालाजी संकुल अपार्टमेंट मधील, तळ मजल्यावरील शॉप नं ८ यांसी बांधकाम क्षेत्र ४१.८२ चौ.मी. यांसी चतु:सिमा मंजुर इमारत नकाशाप्रमाणे ही मिळकत.

२) सदर मिळकत ही माझे मालकीची आहे. सदर मिळकतीचे पुर्वाश्रमीचे मालक श्री. संजय बाळकृष्णा काळे यांचे लाभातील खरेदीखताचा दस्त ता.१२/१०/२००६ रोजी दस्त नंबर ७००७ /२००६ अन्वये मे. दुय्यम निबंधक सो. नाशिक - १ यांचे कार्यालयात नोंदविलेला आहेत. सदर मुळ खरेदीखताचा दस्त व त्याची मुळ रजिस्ट्रेशन पावती माझेकडुन ता. २६/०२/२०२४ रोजी कागदपत्रांचे झेरॉक्ससाठी नेत असतांना दत्त मंदीर चौक, देवपुर, धुळे या परिसरात अनावधानाने गहाळ झालेली आहे. सदर दस्तांचा मी शोध घेतला असता सदरचे दस्त मला आढळून आलेले नाही. यास्तव ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे. सबब सदर मुळ दस्तऐवज व मुळ रजिस्ट्रेशन पावती भविष्यात कोणासही आढळून आल्यास त्यांनी आमचे कार्यालयात आणून देणेचे करावे वा अगर सदर दस्तांबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारच्या हरकती असल्यास त्यांनी आमचे खालील पत्यांवर साक्षांकित प्रतींसह ७ दिवसांचे मुदतीत लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास प्रस्तुत दस्तांबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे ग्राह्य धरण्यात येईल व भविष्यात कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ग्राहय धरली जाणार नाही. सदरची नोटीस ही केवळ सदरचे दस्त गहाळ झालेमुळे त्यांचा कोणीही दुरुपयोग करु नये या हेतुने प्रसिध्द केलेली आहे.

कळावे, ही जाहीर नोटीस.
धुळे
दिनांक - २८/०२/२०२४

आमचे मार्फत प्रसिध्दीस
**ॲड. वैभव देवेंद्र जडे**
ऑफिस बीसी -१४, बेसमेंट, ठक्कर बाजार,
सावित्री फटाका शॉपजवळ,नविन सी.बी.एस., नाशिक

**ॲड.अनिल किसन गवळी**
**नि. ६**

**जाहीर नोटीस**

**धुळे येथील म. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो.धुळे यांचे कोर्टात.**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३३४/२०२४**

भारती मधुकर पाटील ....अर्जदार
॥ वि ॥
कोणीही नाही .....जाबदेणार
कै.आदित्य मधुकर पाटील .... मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. १ धुळे यांचे कडे दि.२३/०२/२०२४ रोजी कि. दि. अर्ज नं. ३३४/२०२४ चा अर्ज कै. आदित्य मधुकर पाटील रा. मु.पो. कापडणे, ता. जि. धुळे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवून मिळणेसाठी व त्यांचे सामाईक नावावर असलेली मौजे कापडणे ता. जि. धुळे येथील गट नं. १५३३/१/ब हया मिळकतीवर नाव लावण्यासाठी (Legal Heirship Certificate) मिळणेकामी सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी सदरचा अर्ज हया मे. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौकशी दि.०६/०४/२०२४ ही निश्चीत केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस वैगेरे संबंधीताना कळविण्यात येते की, सदर अर्जासंबंधी कुणास काहीही हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस व तत्पूवी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाची काहीही हरकत आली नाही, तर सदर अर्जास कोणाची काहीही एक हरकत नाही असे समजून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची/ हरकतीची कोणतीही दाखल घेतली जाणार नाही.

सदरची जाहीर नोटीस मे. न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली असे.

धुळे
दि.२७/०२/२०२४ आदेशावरुन
शिक्का
**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर,धुळे** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर,धुळे**

**ॲड. दिनेश उत्तम फुले**
**नि. ६**

**जाहीर नोटीस**

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो क. स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज क्र.३१३/२०२४**

१. श्रीमती भारती चंद्रकांत वाणी, उ. व. ५५, धंदा - घरकाम २. श्री. सागर चंद्रकांत शिरूडे (वाणी), उ. व. ३५, धंदा - व्यापार, ३. श्री. योगेंद्र चंद्रकांत शिरूडे (वाणी), उ. व. ३२, धंदा- व्यापार ४. सौ. दामिनी निखिल शिंदे (लग्नानंतरचे नाव) कु. दामिनी चंद्रकांत शिरूडे (लग्नापुर्वीचे नाव) उ. व. २७, धंदा-घरकाम, नं. १ ते ४ रा. गल्ली नं. ३, मु. पो. कुसुंबा, ता. जि. धुळे. .....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही .....सामनेवाला
आणि
कै. चंद्रकांत नारायण शिरूडे (मयत)
मृत्यु दि. १९/०१ / २०२४ मृत्यु ठिकाण : कुसुंबा, ता. जि. धुळे
..... मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात कै. चंद्रकांत नारायण शिरूडे (मयत) यांचे अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय, अनुकंपतत्वावरील नोकरीकरीता तसेच इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसेच अर्जदार नं. १ ते ४ हे कै. चंद्रकांत नारायण शिरूडे (मयत) यांचे कायदेशीर वारस असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. २०/०२/२०२४ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.३०/०३/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर कोर्ट नं.५ यांचे न्यायलयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनाक :- २३/२/२०२४ आदेशावरुन
शिक्का
**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.** **मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

**नि. ६**

**जाहीर नोटीस**

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**कि. दि. अर्ज. क्र.५०/२०२४**

१) अफरूकबाई रतन पाटील, उ. वय.:- ६५, वर्ष, कामधंदा, घरकाम २) यागेश रतन पाटील, उ. वय.:- ३४, वर्ष, कामधंदा, मजुरी अर्जदार क १ व २ रा. नगाव ता जि धुळे ३) मनिषाबाई ज्ञानेश्वर पाटील, उ. वय.:- ४०, वर्ष, कामधंदा, घरकाम रा. हिगणे ता चोपडा जि जळगाव ४) छायाबाई विश्वास पाटील, उ. वय.:- ३६, वर्ष, कामधंदा, घरकाम,
रा. लासुर ता चोपडा जि जळगाव .........अर्जदार
वि
कै. रतन चितामण पाटील (मयत) मृत्यु दिनांक १९/०४/२०२१
मुत्यु ठिकाण नगाव ता.जि.धुळे ...... सामनेवाला
बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट Vill १८२७ कलम २ व ७ अन्वये कायदेशीर वारस दाखला मिळणेसाठी अर्ज.

ज्याअर्थी अर्जदार याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क स्तर. यांचे न्यायालयात दि. ५/१/२०२४ रोजी दि. कि. अर्ज. नं. ५०/२०२४ दाखल केलेला आह कै. रतन चितामण पाटील हे मयत झाल्यानंतर त्याचे वारस डिक्लेर घोषित होवुन मिळण्यासाठी अर्जदार यानी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे अर्जदार याना वारस दाखला हा शासकीय, निमशासकीय कामासाठी तसेच महसुल दप्तरी, नगर भुमापन कार्यालयात सदर वारस दाखला अर्जदार याना मयताचे कायदेशीर वारस आहेत असे घेषीत होवुन मिळण्यासाठी वर नमुद कार्यालयात लागणार आहे. म्हणुन अर्जदार यानी सदरचा अर्ज मे न्यायलयत दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. १२-०४-२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो क स्तर कोर्ट नं. ७., यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २७/०२/२०२४ आदेशावरुन
शिक्का
**कामगिरी कारकुन** **अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, धुळे** **दि.न्या.व.स्तर, धुळे**

## न्यूज कॉलम

### चौगावात समाजकार्यच्या विद्यार्थ्यांकडून जनजागृती

**धुळे ।** तालुक्यातील चौगाव येथील हिंगणे पाड्यावर डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे व जनसाहस संस्थेच्या वतीने डॉ सुदाम राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बालविवाह प्रतिबंधात्मक पथनाट्य आयोजित करण्यात आले होते. तसेच त्यामुळे सामाजिक वैद्यकीय समस्या तसेच कायदेशीर शिक्षा याविषयी जनजागृती व माहिती देण्यात आली. यावेळी सरकारच्या विविध टोल फ्री नंबर विषयी माहिती देण्यात आली यावेळी विद्यार्थ्यांचा सहभाग लाभला.

### मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा

**धुळे ।** श्री विलेपार्ले केळवणी मंडळ मुंबई संचलितधुळे येथील एस.व्ही. के.एम. सीबीएसई स्कूल मध्ये मराठी राजभाषा दिन साजरा झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता सहावीतील श्रव्या पगारे व अनुश्री खैरनार यांनी केले. इयत्ता सहावीतील ध्रुव पाटील याने भाषणातून मायबोलीचे महत्त्व सांगितले.

### शिरपुरात १० माच रोजी आनंद मेळावा

**शिरपूर ।** शिरपूर शहरातील 'अस्तित्त्व व मुकेशभाई पटेल चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने द्वेता भूपेशभाई पटेल यांच्या संकल्पनेतून येत्या १० मार्च रोजी सखी आनंदी मेळावा महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील करवंद नाकाजवळील आर.सी.पटेल फार्मसी मैदानावर घेण्यात येणार आहे. जागतिक महिला दिननिमित्त तालुक्यातील आदिवासी महिला, युवती भगिनी व शहरातील भगिनी यांच्यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन द्वेता पटेल यांनी केले आहे.

# महासंस्कृती महोत्सवात पावसाने आणला व्यत्यय; चित्रकारांचे नुकसान

**पुरुषोत्तम पाटील । लक्ष महाराष्ट्र वृत्त**







धुळ्यात पावसाने महासंस्कृती महोत्सवाचा फज्जा उडवला आहे. अवकाळी पावसामुळे महासंस्कृती महोत्सवातील चित्रदालनाचे नुकसान, चित्रकारांचा संताप अनावर झाला. एकीकडे महासंस्कृती महोत्सवाच्या नावाने कोट्यावधी रुपये उधळले जात असताना दुसरीकडे मात्र कलेचे सादरीकरण करण्यासाठी व्यवस्था नसल्याने चित्रकारांचा संताप व्यक्त करताच अधिकाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली.

यामुळे त्या ठिकाणी आलेल्या चित्रकारांचे मोठे नुकसान देखील झाले आहे. दरम्यान, एकीकडे जिल्ह्यात दुष्काळाचे चित्र आहे. नदी तलाव कोरडे ठाक पडले आहेत. पाण्यासाठी गाव खेड्यातील नागरिकांची वणवण भटकंती होत आहे. त्याचबरोबर जनावरांच्या चाऱ्याचा देखील प्रश्न शेतकऱ्यांपुढं उभा ठाकलाय. तर दुसरीकडे शासनाने निधी दिला म्हणून कोट्यावधींची उधळण हे महासंस्कृती महोत्सवाच्या नावानं जिल्हा प्रशासनाकडून केली जात आहे. यामुळे जिल्हा प्रशासनाविरोधात आता धुळेकरांमधून संताप व्यक्त केला जात आहे. मंडप ओले झाले. त्यामुळे नव्याने तयारी करावी लागेल. पोलिस कवायत मैदानावर महासंस्कृती महोत्सव सुरू आहे. या ठिकाणी ६० चित्र मांडली होती.पावसामुळे महोत्सवात चित्रकारांनी मांडलेल्या चित्रांचे नुकसान झाले. पावसाचा इशारा दिला असतानाही प्रशासनाने उपाययोजना न केल्याने कलावंतांनी नाराजी व्यक्त केली.

### एकाच वेळी निर्माण होणार चित्र

एखाद चित्र हे एकाच वेळी निर्माण होऊ शकते. व ते अनेक वर्ष जपले जात असते. अशा महत्वाच्या चित्राचे असे नुकसान होणे मोठी दुर्दवी गोष्ट आहे. कलाकारांचा वारसा जपणाऱ्या महाराष्ट्रात अवहेलना ही आहे का असा प्रश्न यावेळी कलाकारांनी उपस्थित केला.

### अनेक वर्ष सांभाळून ठेवलेली पेंटिंग खराब

एका चित्रकारांनी चित्र पूर्ण केले तर त्यांची नाळ कापली जाते. ते चित्र पुन्हा निर्माण होऊ शकत नाही. प्रशासनाच्या वतीने दखल घेतली गेली नाही असा आरोप देखील यावेळी करण्यात आला. अनेकवर्ष सांभाळून ठेवलेली पेंटिंग खराब झाल्याने कलाकारांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली.

# धुळे शहरात सेक्युलर परिषदेचे यशस्वी आयोजन
# १६ राजकीय पक्ष, ३० सामाजिक संघटना एकत्र

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**





धुळे शहरामध्ये सेक्युलर परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. धुळ्यात जातीयवादी लोकांच्या विरोधात सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयोग यशस्वी झाला. सेक्युलर परिषदेमध्ये १६ धर्मनिरपेक्षक राजकीय पक्ष,३० सामाजिक संघटना, विचारवंत, बुद्धिजीवी, धर्मगुरू, सामाजिक कार्यकर्ते आदींनी सहभाग घेतला. असे सेक्युलर परिषदेचे समन्वयक श्री रणजीत राजे भोसले यांनी कळविले आहे. सेक्युलर परिषदेची सुरुवात महापुरुषांना पुष्पहार घालून करण्यात आली. सेक्युलर परिषदेचा मुख्य उद्देश जातीवादी, कट्टरपंथी लोकांना रोखणे. शहरांमध्ये अमन, एकता, शांती निर्माण करणे.सर्व जाती-धर्मातील लोकांना एकत्र आणून एकात्मता वाढविणे. सोशल मीडियावरील दुष्प्रचारला उत्तर देणे. हाच मुख्य उद्देश होता.

या परिषदेमध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती,राष्ट्रसेवा दल, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना उबाठा,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, संविधान बचाव समिती,जमियत ए हिंद, सत्यशोधक विद्यार्थी संघटना,वंचित बहुजन आघाडी, मराठा सेवा संघ, बामसेफ, समाजवादी पार्टी,आम आदमी पार्टी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, भारतीय बौद्ध महासभा, भारतीय कम्युनिस्ट पार्टी, हरिजन सेवक संघ, छत्रपती संभाजी महाराज स्मारक समिती, शेतकरी कामगार पक्ष, जमाते इस्लामी, राष्ट्रीय जनता दल, जनसेवा मंच, भीम आर्मी, महाराष्ट्र एकलव्य आदिवासी संघटना, मल्हार महासंघ, शाहू महाराज संघर्ष समिती,संभाजी ब्रिगेड,वेल्फेअर पार्टी ऑफ इंडिया, बहुजन समाज पार्टी, समता समाज संघ, लोकसेवा ग्रुप,सर्वधर्मसंघ, भीम बुद्ध सिल्वर समिती, कॉरिडॉर विकास समिती, छात्र भारती, निसर्ग मित्र समिती, मराठी पत्रकार परिषद,युवा दक्ष पत्रकार संघ, साहित्यिक परिषद, पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद, मुस्लिम ओबीसी संघटना, शिक्षक सभा, ओबीसी आरक्षण बचाव समिती, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, अन्सारी सभा, राज्य कर्मचारी संघटना, परिवर्तन फाउंडेशन, भीम शक्ती संघटना, आंतरराष्ट्रीय मानव अधिकार फोरम, दक्ष नागरिक संघ,इत्यादी संघटनांनी या परिषदेमध्ये सहभाग नोंदविला.

या परिषदेमध्ये मोहम्मद समी,ब्रह्मकुमारी रिटा दीदी,माजी आमदार शरद पाटील,डॉक्टर अनिल पाटील,डॉक्टर सर्फराज अन्सारी,हितेश पवार, गुड्डू काकर ,खलील अन्सारी,रमेश श्रीखंडे, दरबारसिंग गिरासे, साबीर शेख, शाम सनेर, किरण जोंधळे, राज चव्हाण,योगेश जगताप,भैय्या परेराव, एडवोकेट संतोष जाधव, राहुल वाघ, विशाल साळवे, जमील मंसूरी,एडवोकेट इम्रान शेख, अविनाश पाटील, हेमंत मदाणे, हरिचंद्र लोंढे,पोपटराव चौधरी, एडवोकेट एल आर राव,एडवोकेट जुबेर शेख, मधुकर शिरसाट, हेमंत भडक, सवाल अन्सारी, अतावू रहेमान, सत्तार शहा, इस्माईल पठाण,भानुदास बगदे, विनोद जगताप,नाना कदम,अर्जुन पाटील,डॉक्टर संजय पाटील, आप्पासाहेब तायडे,आनंद लोंढे, ,सुनील लोंढे ,बाबा हातेकर, योगेश इशी,हिरालाल सापे,आनंद सैंदाणे,मोहम्मद जैद, दीपक सोनवणे,संजय चव्हाण,अशोक धूळकर, अण्णा सूर्यवंशी,नितीन गायकवाड, अनिल दामोदर, नजनीन शेख, सिद्धांत बागुल, इशाक शेख, सरफराज अन्सारी, शंकर खरात, जाकीर शहा,गोपाल माने, गोपी लांडगे, हर्ष मोरे,यांनी चर्चामध्ये भाग घेऊन आपले विचार मांडले.

## सीईओ दालनास कुलूप ठोकल्याचा अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून निषेध

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता यांच्या दालनाला कुलूप लावत कर्मचाऱ्याला धक्काबुक्की केल्याप्रकरणी जिल्हा परिषद सदस्या सुनीता सोनवणे, शानाभाऊ सोनवणे यांच्यासह चार जणांविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. यांपैकी एका आंदोलकास अटक करण्यात आली असून, पोलिस कोठडी सुनावली आहे. उर्वरित संशयित फरारी असून, पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

दरम्यान, या आंदोलनाचे तीव्र पडसाद जिल्हा प्रशासनात उमटले असून, पंचायत समिती व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून निषेध व्यक्त केला. जिल्हा परिषद अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाने सोमवारी (ता. २६) दुपारी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांची भेट घेत निवेदन दिले. या संदर्भात जिल्हा परिषद कर्मचारी अभिषेक गायकवाड यांनी धुळे शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की २३ फेब्रुवारी २०२४ ला जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गुप्ता यांच्या जिल्हा परिषदेतील दालनाबाहेर नेहमीप्रमाणे ड्यूटीवर असताना जिल्हा परिषदेच्या सदस्या सुनीता सोनवणे यांचे पती शानाभाऊ सोनवणे. कलमाडीचे उपसरपंच विजेंद्र छबिलाल पाटील, रावसाहेब उत्तम ईशी हे काही विद्यार्थी व पालकांसोबत दालनाजवळ आले. साहेब नसल्याचे सांगितल्यावर चौघांनी दालनाला कुलूप लावले, कुलूप लावू नका, असे सांगितले असता त्यांनी मला धक्काबुक्की करून दमदाटी केली. तसेच दालनासमोर बसून घोषणा देत आंदोलन सुरू केले. त्याच वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गुप्ता दालनात जाण्यासाठी आले असता वरील चौघांनी त्यांचा रस्ता अडविला. तसेच त्यांना त्यांचे कर्तव्य करण्यापासून रोखून ठेवले.

## बाफना शाळेत पारितोषिक वितरण



**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

वनिता समाज संचलित श्रीमती सुं. छ. बाफना प्राथमिक शाळा धुळेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम राजश्री शाहू महाराज कला मंदिर पारोळा रोड धुळे या ठिकाणी संपन्न झाला.

यावेळी मंचावर शाळेच्या अध्यक्षा सुलोचना अग्रवाल, प्रमुख अतिथी मनपा प्रशासन अधिकारी श्री विश्र्वंभर दासरवड. सरोज देशपांडे, सेवानिवृत्त शिक्षिका कमलाबाई कन्याविद्यालय धुळे. सचिव आरती महाले, सहसचिव शोभना बागुल, खजिनदार साधना मानेकर, समिती सल्लागार अलका बियाणी, मुख्याध्यापिका श्रीमती आशा निकुंभ, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष फिरोज शेख. माजी अध्यक्ष अरुणानाईक, सुमन महाले, उषा जोग, भारती महाले, वैशाली लहामगे, शीला अग्रवाल, सभासद भगिनी विजया झेंडे, चंपा अग्रवाल तसेच शाळेच्या माजी मुख्याध्यापिका, शिक्षिका आदी मान्यवर उपस्थित होते. दीपप्रज्वलन करून सरस्वती पूजन करण्यात आल. इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी. ईशस्तवन व स्वागत गीत कृतीतून सादर केले. मुख्याध्यापिका आशा निकुंभ यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ज्येष्ठ शिक्षिका तोरवणे व रूपाली उपासनी यांनी मान्यवरांचे स्वागत व सत्कार केला. मनीषा कोठावदे यांनी शाळेच्या वार्षिकअहवालाचे वाचन केले. त्यानंतर बक्षीस पात्र विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. बालमंदिरच्या विद्यार्थ्यांची फॅन्सी ड्रेस स्पर्धा व विविध वेशभूषा साकारून उपस्थितांचे लक्ष वेधले. यावर्षी सांस्कृतिक कार्यक्रमाची थीम रामायण ही ठेवण्यात आली होती. यावेळीर बालमंदिर ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषेत रामायणातील पात्रांच्या भूमिका करत नृत्य व नाटिका सादर करून व रामायनातील विचार मांडुन उपस्थितांची मने जिंकली. मान्यवरांनी मुलांचे कौतुक केले. ४०० विदयार्थ्यींनी यात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सुत्र संचालन हर्षल पाटिल व मनिषा ठाकुर यानी केले व आभाराचे काम अरविंद वसावे यांनी पाहिले.

## मनोज जरांगेंना सरकारने चुकीची वागणूक दिल्यास भविष्यात गंभीर परिणाम

**सकल मराठा समाजाचा इशारा**

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**

मराठा समाज व मनोज जरांगे पाटील यांना चुकीची वागणूक दिल्यास भविष्यात सरकारमधील पक्षांना गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशा इशारा येथील सकल मराठा समाजातर्फे देण्यात आला आहे.

यासंदर्भात सकल मराठा समाजबांधवांची बैठक नुकतीच पार पडली. यावेळी समाजबांधवांनी सरकारच्या भुमिकेबाबत मनोगत व्यक्त करत रोष व्यक्त केला. मराठा समाज सर्व आंदोलने शांततेत व सुरळीतपणे करत आहे. असे असतानाही सरकार व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेतू पुरस्सर मराठा समाजाला टार्गेट करून स्वतः अनुचित घटना घडवून आणून त्याचा दोष मराठा समाजावर लादत आहे. आणि मराठा समाजाला बदनाम करण्याचे षडयंत्र रचत आहेत. सरकारमधील मंत्री छगन भुजबळ, नारायण राणे, नितीश राणे, बावनकुळे यांच्या माध्यमातून सरकारने जाती-जातीत तेढ निर्माण केली. ओबीसी समाजाला मराठ्यांच्या विरुद्ध उभे केले. पण आता मराठा समाज कुणापुढे झुकणार नाही. जो राजकीय पक्ष अथवा नेतेमंडळी मराठा समाजाला टार्गेट करेल, आंदोलनाला गालबोट लावेल आणि मनोज जरांगे पाटील यांच्या विरुद्ध अपशब्द वापरेल त्याला मराठा समाज भविष्यात त्याची जागा दाखवून देईल. हे सर्व राजकीय नेतेमंडळी व पक्षांनी लक्षात ठेवावे. सध्या मुख्यमंत्री व नाना पटोले यांच्या संभाषणाचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. त्यात मुख्यमंत्री कार्यक्रम करण्याची भाषा करत आहेत. यातून सरकारकडून जरांगेच्या जीवाला धोका असल्याचे समजते. सरकार ऐनकेनप्रकारे जरांगे पाटलांना अडकवू पहात आहे. ओबीसीतून आरक्षणाची मागणी असताना १० टक्के स्वतंत्र आरक्षण देवून सरकारने मराठा समाजाची दिशाभूल केली. कुणबी दाखले वाटप सुरु असल्याचा देखावा करुन सरकार केवळ वेळ मारुन नेण्याचे काम करत आहे. सरकारमधील राजकीय पक्षांनी मनोज जरांगे अथवा मराठा समाजाची बदनामी केल्यास होणार्या परिणामास सरकार जबाबदार राहिल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. बैठकीस सुधाकर बेंद्रे, साहेबराव देसाई, भानुदास बागदे, विनोद जगताप, राजेंद्र काळे, निंबा मराठे, मनोज ढवळे, किशोर वाघ, भैय्या शिंदे, कैलास वाघारे, दिनेश काळे, सुनील ठाणगे, जितू जगताप, विलास पोकळे, बाळासाहेब ठोंबरे, मनोज रुईकर, देव पवार, श्याम रायगुडे, गोविंद वाघ, लालचंद पाटील, अभिनय पाटील, निलेश यादव, भूषण बागुल, उल्हास पाटील, मनोज थोरात, वामन मोहिते आदींसह समाजबांधव उपस्थित होते.

## पॉवर लुम कामगारांना सुविधा मिळणार : आ.फारुख शाह

**धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



धुळे शहरात सुमारे पंधरा ते वीस हजार पॉवर लुम कामगार असून हे कामगार अत्यंत दयनीय अवस्थेत जगत आहेत.या कामगारांचा समावेश कामगार मंडळात नसल्यामुळे त्यांना इतर कामगारांप्रमाणे त्यांना सुविधा मिळत नाहीत.शहरातील पॉवर लुम कामगारांनी आ.फारुख शाह यांची भेट घेवून इतर कामगारांना ज्या सुविधा शासनाच्या माध्यमातून मिळतात तशा सुविधा पॉवर लुम कामगारांना मिळाव्यात अशी मागणी केली होती.

त्यानुसार आ.फारुख शाह यांनी अधिवेशन काळात कामगार कल्याण मंत्री ना.सुरेश खाडे याची प्रत्यक्ष भेट घेवून पॉवर लुम कामगारांचा समावेश कामगार कल्याण मंडळात करण्यात यावा अशी पत्राद्वारे मागणी केली.ना.सुरेश खाडे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित अधिकाऱ्यांना उचित कार्यवाही करण्याचे आदेश दिलेत. पॉवर लुम कामगारांचा कामगार कल्याण मंडळात समावेशाचा मार्ग मोकळा झाल्यामुळे शहरातील पॉवर लुम कामगारांनी आ.फारुख शाह यांना धन्यवाद देत समाधान व्यक्त केले आहे.




## यशप्राप्तीसाठी कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही : एपीआय जयेश खलाने

**पिंपळनेर । लक्ष महाराष्ट्र वृत्त**



यशप्राप्तीसाठी कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही. यश प्राप्तीसाठी गुणात्मकतेला जितके महत्त्व देता तितकेच महत्त्व संस्कार व बौद्धिक ज्ञानाला दिले पाहिजे पिंपळनेर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जयेश खलाने यांनी १०वी वर्गाच्या निरोप शुभेच्छा कार्यक्रमाप्रसंगी बोलतांना सांगितले.

येथील कै. नानासाहेब साहेबराव पंडीत पाटील विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३-२४या या वर्षातील १०वी विद्यार्थी विध्यार्थी वर्गांचा शुभेच्छा निरोप शुभारंभ शुक्रवारी संपन्न झाला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष क्रीडा शिक्षक उदय एखंडे होते तर प्रमुख पाहुणे संस्थेचे अध्यक्ष सुभाष जगताप, सहाय्यक पोलीस निरीक्षक जयेश खलाने, मुख्याध्यापक उमेश पाटील, उपमुख्याध्यापक ललित मुसळे व आर डी सोनजे होते.

यावेळी शालेय विद्यार्थांनी आपली मनोगत व्यक्त करीत शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त करीत शिक्षकांविषयी भावना व्यक्त केल्या. तसेच उच्च माध्यमिक विभागातील प्रा. पी आर मराठे, प्रा.रुपाली पाटील, प्रा.जयदेव पाटील शिक्षकांनी १० वी नंतर काय करावे या विषयी मार्गदर्शन केले तर शिक्षक मनोगत पी एच साळुंके यांनी व्यक्त केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष उदय एखंडे यांनी विद्यार्थ्यांनी नियमित व सातत्यपूर्ण अभ्यास करून स्वत:चे तसेच शाळेचे नाव व आई-वडिलांचे नाव उज्वल करावे असे सांगितले. पाहुण्यांचा परिचय शिक्षक विशाल गांगुर्डे यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन मानसी भामरे, सिद्धी कोठावदे यांनी केले तर आभार प्रदर्शन दिनेश नहीरे यांनी मानले. कार्यक्रमानंतर विद्यार्थांना सुरुची भोजन देण्यात आले.